मुंबई विद्यापीठ

कुलसचिवांचे कार्यालय,
फोर्ट, मुंबई – ४०० ०३२.

प्रति
संकेतस्थळ : www.mu.ac.in
संपर्क क्र.: (०२२) ६८३२०००६

इमेल : registrar@fort.mu.ac.in

क्र. आईजी/आयसीडी/२०२५–२६/४२१

दिनांक : ७ ऑगस्ट, २०२५
सौर, १६ श्रावण शके १९४७

प्रति,
व्यवस्थापकीय संचालक
महात्मा ज्योतिबा फुले
संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य,
नागपूर – ४४० ०२०.

विषय :- अधिछात्रवृत्ती करीता बायोमेट्रिक हजेरी अनिवार्य बाबत .........

संदर्भ :- महाज्योती/संशोधन विभाग/१३४५/२०२५-२६ दिनांक २५/०४/२०२५

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून महाज्योतीकडून दिल्या जाणाऱ्या अधिछात्रवृत्ती करीता बायोमेट्रिक हजेरी अनिवार्य असल्याबाबत परिपत्रक महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेली आहे.

मुंबई विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर व ग्रामीण भागातील संशोधन केंद्रामध्ये विद्यार्थी आपल्याकडे योजनेसाठी अर्ज करीत असतात. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात जवळपास २६८ संशोधन केंद्र कार्यान्वीत आहेत. प्रत्येक संशोधन केंद्रातील अधिछात्र फक्त हजेरी पत्रकावर स्वाक्षरीसाठी मुंबई विद्यापीठ येथे येऊन कुलसचिवांची स्वाक्षरी घेणे विद्यार्थांसाठी अत्यंत गैरसोईचे आहे.

याबाबत मुंबई विद्यापीठ अधिकार मंडळाने सूचित केल्यानुसार संबंधित संशोधन केंद्रातील प्राचार्य/संचालक यांची स्वाक्षरी ग्राह्य धरण्याबाबत परिपत्रक निर्गमित केले आहे. सुलभ संदर्भासाठी परिपत्रकाची पत्र सोबत जोडली आहे.

आपणास विनंती की, संबंधित संशोधन केंद्रातील प्राचार्य/संचालक यांची स्वाक्षरी ग्राह्य धरून महाज्योती कडून अधिछात्र वृत्तीधारक विद्यार्थ्यांना छात्रवृत्ती अदा करण्याची कार्यवाही करावी.

धन्यवाद ,

आपला विश्वासू,

(डॉ. प्रसाद कारंडे)
कुलसचिव

सोबत : वरीलप्रमाणे